



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २०४ * नांदेड * रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ८ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211









साहेब आपले अभिष्टचिंतन
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार
मा.श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर
व
मा.श्री प्रविण पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
४ ऑगस्ट
शुभेच्छुक
दिलीपराव मोहनराव पाटील सुगावकर
मा.चेअरमन, से.स.सो.लि.सुगाव, ता.लोहा
सौ.भगीरथाबाई दिलीपराव पाटील सुगावकर
मा.सरपंच, ग्रा.पं. कार्यालय, सुगाव तथा मा.संचालिका कृ.उ.बा.स.लोहा
सौजन्य : प्रा.श्रीधर दिलीपराव पा.जाधव,
प्रा.विलास दिलीपराव पा.जाधव व सर्व ग्रामस्थ, सुगाव


04 AUGUST
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
श्री.प्रतापरावजी पाटील चिखलीकर
व युवानेते
मा. प्रवीण पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
बाबूराव पाटील गिरे
मा. सदस्य - जिल्हा परिषद नांदेड


लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार
श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेब आपणास वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
दत्तात्रय पाटील पवार
(सेवानिवृत्त वनअधिकारी,नांदेड)


लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
मा.श्री. लोकप्रिय आमदार
प्रतापराव पाटील चिखलीकर
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा मा.सभापती-जि.प.नांदेडचे
मा.श्री.प्रवीण पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
पंडितराव कदम
मा.उपसरपंच, धनज (खु.)
कोंडिबा ढाले
सरपंच, ग्रा.पं.कार्यालय, गोळेगाव


मान्यड खोऱ्याचा बुलंद आवाज
लोकप्रिय आमदार
मा.श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर
मा.श्री प्रविण पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
मारोती पाटील ढेपे वाळकीकर


जनसामान्यांच्या मनातील नेतृत्व
04 AUGUST
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
मा.श्री. लोकप्रिय आमदार
प्रतापराव पाटील चिखलीकर
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा नांदेड जि.प.मा.सभापती
मा.श्री.प्रवीण पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
भगवान पा. सोमवारे (सरपंच)
सुरेश पा. ढगे (संचालक-कृ.उ.बा.स.लोहा)
उत्तम पा. सोमवारे (मा. चेअरमन)
शिवराज ढगे (मा.सरपंच)
गणेश सोमवारे(मा.सरपंच), व्यंकटी ढगे, संतोष ढगे, शिवराम ढगे, प्रशांत ढगे, संदीप सोमवारे, साईनाथ कोटगिरे, सुभाष सोमवारे, भागवत सोमवारे, राजू सोमवारे, भागवत शिंदे, केशव ढगे, शंकर सोमवारे, बळवंत सोमवारे, गोविंद ढगे, गणेश ढगे, उद्धव ढगे, हरिदास ढगे, बालाजी तेलंगे, रामदास सूर्यवंशी, माधव टोकलवाड, गंगाधर टोकलवाड, विष्णू पवार, मिलिंद पवार, गजानन सूर्यवंशी, तिरुपती रापानवाड


लोहा-कंधार विधानसभेचे
लोकप्रिय आमदार, समिती प्रमुख
उपविधान समिती, विधीमंडळ, महाराष्ट्र राज्य,
मराठवाड्याचे लोकनेते, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेबांना जन्मदिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !
शुभेच्छुक - फुलवळ सर्कल
ता.कंधार जि.नांदेड


मन्याड खोऱ्याचा बुलंद आवाज...
लोकनेते,
लोहा-कंधार विधानसभेचे
लोकप्रिय आमदार, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक
शुभेच्छा!
व्यंकटराव पा.गोजेगावकर प्रदेश उपाध्यक्ष,
डॉ.मीनल पा.खतगावकर प्रदेश उपाध्यक्षा
प्रवीण पा.चिखलीकर प्रदेश सरचिटणीस
दिलीपराव धर्माधिकारी प्रदेश सरचिटणीस
मोहम्मद खॉन पठाण प्रदेश सरचिटणीस
वसंत सुगावे प्रदेश सरचिटणीस
शिरीष गोरठेकर प्रदेश सरचिटणीस
नागनाथ घिस्सेवाड प्रदेश सरचिटणीस
मुक्तेश्वर धोंडगे प्रदेश संघटक सचिव
माणिकराव मुकदम प्रदेश संघटक सचिव
सौ.वैशालीताई चव्हाण प्रदेश उपाध्यक्षा,रा.काँ.पा.महिला
श्रीमती.चित्राताई लुंगारे प्रदेश सरचिटणीस,रा.काँ.पा.महिला
सौ. अनुसायाताई केंद्रे प्रदेश सरचिटणीस,रा.काँ.पा.महिला
सुनील नानवटे सचिव,रा.काँ.पा.
दादाराव ढगे प्रदेश सचिव,रा.काँ.पा.
उत्तमराव सोनकांबळे प्रदेश संघटन सचिव,रा.काँ.पा.
सुरेश राठोड प्रदेश सरचिटणीस,रा.काँ.पा.(ओबीसी)
सचिन नाईक प्रदेश संघटन सचिव,रा.काँ.पा.
स्वप्नील लुंगारे प्रदेश संघटन सचिव,रा.काँ.पा.
शुभेच्छुक - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नांदेड जिल्हा
मराठवाड्याचे
लोकनायक
लिंबोटी धरणाचे शिल्पकार, कुशल संघटक...
समिती प्रमुख
उपविधान समिती, विधीमंडळ,
महाराष्ट्र राज्य तथा लोहा-कंधार विधानसभेचे
लोकप्रिय आमदार, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक
शुभेच्छा!
मनोहरराव भोसीकर तालुकाध्यक्ष,कंधार
छत्रपती स्वामी तालुकाध्यक्ष,लोहा
बळीराम पवळे तालुकाध्यक्ष, नायगाव
दिपक पा.चाळाकेकर तालुकाध्यक्ष, धर्माबाद
सुधाकर देशमुखे तालुकाध्यक्ष, उमरी
शिवाजीराव कनकटे तालुकाध्यक्ष, देगलूर
रणजीत हिवरोळे तालुकाध्यक्ष, बिलोली
बाबुराव कदम तालुकाध्यक्ष,मुखेड
सुरेश बिल्लेवाड तालुकाध्यक्ष,भोकर
आत्माराम कपाटे तालुकाध्यक्ष,अर्धापूर
हनुमंत नटूरे तालुकाध्यक्ष,मुदखेड
निळू पाटील तालुकाध्यक्ष,हदगाव
वामनराव मिराशे तालुकाध्यक्ष,हि.नगर
विजय राठोड तालुकाध्यक्ष,माहूर
बाळू पवार तालुकाध्यक्ष,किनवट
दीपक पावडे तालुकाध्यक्ष,नांदेड उ.
सोपान मोरे तालुकाध्यक्ष,नांदेड द.
शुभेच्छुक - तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नांदेड जिल्हा


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नांदेड जिल्हा
वाढदिवस शुभेच्छा
उगवता सूर्य
आपणांस आशीर्वाद देवो,
बहरलेली फुले आपणास
सुगंध देवो व
प्रार्थना ईश्वरचरणी
आपणास सदैव
सुखात ठेवो
मन्याड खोऱ्याचा बुलंद आवाज...
लोकनेते,
लोहा-कंधार विधानसभेचे
लोकप्रिय आमदार, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक
शुभेच्छा!
देवेंद्र मोतेवार शहराध्यक्ष,देगलूर
मिलिंद मांजरमकर शहराध्यक्ष,बिलोली
जीवन चव्हाण शहराध्यक्ष,नायगाव
नरेश रेड्डी शहराध्यक्ष,धर्माबाद
राम पवार शहराध्यक्ष,लोहा
जवाजवोद्दीन बरबेडकर शहराध्यक्ष,भोकर
साबेर शेख शहराध्यक्ष,अर्धापूर
मोहम्मद साजिद शहराध्यक्ष,मुदखेड
खाजा शेख शहराध्यक्ष,हदगाव
अनिल धुमाळ शहराध्यक्ष,हि-नगर
फारुख शेख शहराध्यक्ष,किनवट
सय्यद रईस अली शहराध्यक्ष,माहूर
नागनाथ गायकवाड शहराध्यक्ष,मुखेड
शुभेच्छुक - शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नांदेड जिल्हा

# मन्याड खोऱ्याच्या जनविश्वासाचा बुलंद आवाज : लोकनेते आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

सत्तेची पदे अनेकांना मिळतात, पण जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण करण्याचे भाग्य मोजक्यांनाच लाभते. कारण लोकनेता हा निवडणुकीच्या मतपेटीतून घडत नाही; तो घडतो जनतेच्या अश्रूंना आधार देताना, संघर्षात खंबीरपणे उभा राहताना आणि विकासाची स्वप्ने प्रत्यक्षात उतरविताना. लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे अशाच लोकविश्वासातून घडलेले नेतृत्व आहे.

२ ऑगस्ट हा त्यांचा वाढदिवस. हा केवळ एका लोकप्रतिनिधीचा जन्म दिन नाही, तर जनतेसाठी झिजणाऱ्या, समाजहितासाठी झटणाऱ्या आणि विकासाला आयुष्याचे ध्येय मानणाऱ्या एका कर्मयोग्याचा गौरव करण्याचा दिवस आहे.



गेली चार दशके चिखलीकर कुटुंबाने जनतेशी जपलेले नाते हे राजकारणाच्या पलीकडचे आहे. सत्ता आली म्हणून जनता जवळ नाही आणि सत्ता गेली म्हणून जनता दूर नाही असे हे विश्वासाचे नाते काळाच्या प्रत्येक कसोटीवर टिकले आहे. या परंपरेचा सक्षम वारसा पुढे नेताना प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोकप्रतिनिधित्वाला केवळ राजकीय जबाबदारी न मानता सामाजिक बांधिलकीचे स्वरूप दिले.

आज लोहा-कंधार मतदारसंघाचा उल्लेख विकासाच्या दृष्टीने होत असेल, तर त्यामागे त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची मोठी ताकद आहे. ग्रामीण भागा-तील रस्त्यांचे जाळे, पूल, पिण्याच्या पाण्याच्या योजना, सिंचन, शिक्षण, आरोग्य सुविधा, धार्मिक स्थळांचा विकास आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा ध्यास मतदारसंघाच्या प्रगतीचा महत्त्वाचा आधार ठरला आहे. अनेक वर्षे रखडलेल्या प्रश्नांना त्यांनी शासनाच्या दालनात सातत्याने आवाज दिला आणि त्यांना मार्गी लावण्यासाठी अथक प्रयत्न केले.

मात्र विकासकामांपेक्षाही जन-तेला अधिक भावते ती त्यांची माणुसकी. एखाद्या गरीबाच्या घरात संकट कोसळले, शेतकऱ्याला न्यायासाठी संघर्ष करावा लागला, विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदतीची गरज भासली किंवा एखादा रुग्ण उपचारासाठी धडपडत असला, तर मदतीचा हात पुढे करणाऱ्या मोजक्या लोकप्रतिनिधींमध्ये प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यामुळेच त्यांचे कार्यालय हे अनेकांसाठी आशेचे दार बनले आहे.

जनतेने त्यांना दिलेली मन्याड खोऱ्याचा वाघ ही उपाधी केवळ राजकीय ताकदीची नाही; ती अन्यायाविरुद्ध उभे राहण्याच्या त्यांच्या निर्भीड स्वभावाची साक्ष आहे. मतदारसंघाच्या प्रश्नांवर शास-नाला जाब विचारताना त्यांचा आवाज ठाम असतो, तर जनतेच्या व्यथा ऐकताना त्यांचे मन तितकेच संवेदनशील असते. संघर्षाची धार आणि माणुसकीची ऊब यांचा दुर्मीळ संगम त्यांच्या नेतृत्वात दिसून येतो.

आजच्या राजकारणात जनते-पासून दूर जाणाऱ्या नेतृत्वाची चर्चा होत असताना प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी मात्र जनतेशी असलेली नाळ अधिक घट्ट केली आहे. त्यांच्या दालनात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपुलकीची वागणूक मिळते. राजकीय पक्ष, जात, धर्म किंवा आर्थिक स्थिती न पाहता मदतीसाठी धावून जाण्याची त्यांची वृत्तीच त्यांच्या लोकप्रियतेचा खरा पाया आहे.

लोकशाहीत निवडणुका जिंकणे हे यशाचे मोजमाप असू शकते; पण जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणे हीच खरी नेतृत्वाची ओळख असते. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विकास, विश्वास आणि जनसेवेच्या त्रिसूत्रीवर उभे राहून ही ओळख निर्माण केली आहे. म्हणूनच लोहा-कंधारच्या जनतेसाठी ते केवळ आमदार नाहीत, तर संकटात धावून येणारा आधार, विकासाची खात्री आणि लोकविश्वासाचे प्रतीक आहेत.

२ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त जनतेच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करणारे, विकासाला वेग आणि जन-सेवेला दिशा देणारे लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या कार्याचा हा प्रवास अधिक व्यापक व्हावा, समाजहिताची त्यांची धडपड अधिक जोमाने सुरू राहावी आणि जनतेचा हा विश्वास अधिक दृढ व्हावा, हीच असंख्य नागरिकांची सदिच्छा.

**– मारुती जाधव**
स्वीय सहाय्यक,
आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

# जननायक ते नातवंडांचे लाडके आजोबा...

आज ६५ व्या वाढदिवशी पप्पांकडे पाहताना त्यांच्या राजकीय, सामाजिक कार्याचा गौरव वाटतो. कारण गेली अनेक दशके त्यांची लोकांसाठी काम करण्याची ऊर्जा आजही तशीच आहे. त्यांच्या आयुष्यातील कित्येक वर्षे फक्त स्वतःसाठी नाही तर सर्वसामान्य जनतेसाठी जगली. चिखली गावचे सरपंच ते खासदार आणि आता आमदारकीपर्यंतचा त्यांचा हा राजकीय आलेख नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागापासून विकासाची सुरुवात करणारे आदरणीय साहेबांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून केंद्र सरकारच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्याच्या भोवताल नांदेड जिल्ह्यामध्ये, गॅस प्रकल्प, रेल्वे गाड्यांची वाढ, नॅशनल हायवेचे जाळे विणले गेले.

अडी-अडचणीत असलेली, निराश, हताश झालेले नागरिक मोठ्या विश्वासाने साई-सुभाष जनसंपर्क कार्यालय इथं आपलं काम घेऊन येतात आणि जनता दरबारच्या माध्यमातून हजारो जनतेचे प्रश्न तत्काळ साहेबांच्या माध्यमातून सोडविले जातात हे विशेष. परत जाणारी प्रत्येक व्यक्ती समाधानी, आनंदी, कृतज्ञ भावना व्यक्त करत जाते.म्हणूनच येथील सर्वसामान्य जनतेने साहेबांना दिलेली पदवी जनता माझी मी जनतेचा हे त्यांच्या कार्याची पावती होय. शेती, शेतकरी, मजूर, विद्यार्थी, व्यापारी, व्यावसायिक, जलसिंचन, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रामध्ये त्यांच्या सर्वस्पर्शी नेतृत्वामध्ये अनेक प्रचंड विकासात्मक बदल झाले. संघर्षाच्या वाटेवर खडतर प्रवास करत आजपर्यंतच्या या प्रवासात त्यांनी जमवलेली खंबीर, निष्ठावंत, जीवापाड माणसे, त्यांच्यावर हक्काने प्रेम



करणारे त्यांची निष्ठावंत कार्यकर्ते आणि त्यांच्या सुख-दुःखात साथ देणारा त्यांच्या हक्काचा खंबीर, संवेदनशील नेता म्हणजे माझे पप्पा.

लहानपपासून मी अतिशय जवळून पाहत आले आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत जनसेवेसाठी त्यांची असणारी आवड माझे आजोबा कै. शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या संस्कारात वाढलले माझे पप्पा आजोबांच्या जनसेवेचा वसा आणि जनकल्याणाचा वारसा घेऊन निरंतर जनसेवा ते आज लोकनेते हा 'किताब पटकवणारे जनतेच्या मनात घर करणारे एक अनन्यसाधारण व्यक्तिमत्व म्हणजे माझे पप्पा. ज्यांनी अखंड आयुष्य जनतेच्या सेवेसाठी त्यांच्या सुखासाठी दुःखासाठी स्वतःला वाहून घेतले अशा माझ्या पप्पांची ओळख एक कणखर, जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आक्रमक नेते, गरजू लोकांसाठी संवेदनशील लोकप्रतिनिधी आणि विधानसभा, लोकसभा क्षेत्रातील जनतेसाठी जनसेवक म्हणून नावलौकिक प्राप्त झाले. या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन मी जेव्हा त्यांच्याकडे बघते तेव्हा मला दिसतात फक्त आणि फक्त माझे पप्पा. आयुष्याच्या प्रत्येकात कौटुंबिक, राजकीय सुख-दुःखात सामान्य परिस्थितीमध्ये पप्पांच्या मागे सावलीसारखी उभी असणारी माझी आई प्रतिभासंपन्न सौ. प्रतिभा प्रतापराव पा. चिखलीकर यांनी दिलेली खंबीर साथ ही पप्पांच्या यशामागचं गुपित आहे.पप्पांनीही आईला वेळोवेळी दिलेली साथ ही आमच्यासाठी एक आदर्श जोडी आहे. म्हणजे पती-पत्नी असणे किंवा त्यांची एकमेकांप्रती कर्तव्य काय असतं, आणि कठीण काळात एकमेकांना साथ देणं म्हणजे काय? या दोघांकडे पाहून कळलं. प्रत्येक नात्याला न्याय देणारे माझे पप्पा एक आज्ञाधारक मुलगा म्हणजे.. आजी-आजोबांच्या मार्गदर्शनात त्यांनी त्यांचा प्रवास चालू ठेवला. आई-वडिलांप्रती असणारा आदर त्यांच्यात मी प्रत्येक क्षणी पाहिलाय. आई-वडिलांचा प्रत्येक शब्द प्रमाण मानणारे तसेच भावंडांवर जीवापाड प्रेम करणारे पप्पा. माझे मोठे काका कै. सुभाषराव पाटील चिखलीकर आणि दुसरे काका इंजिनियर कै. बालाजीराव पाटील चिखलीकर हे दोघे भाऊ दुर्दैवी अकाली गेले. चिखलीकर परिवारावर कठोर नियतीने मोठा आघात केला.पप्पांच्या प्रत्येक पाऊलावर मोठया हिम्मतीने अखंड साथ देणारे बंधू नियतीने खूप लवकर त्यांच्यापासून हिरावले पण त्या क्रूर नियतीपुढे पराभव स्वीकारतील ते पण माझे पप्पा..हे कधीच शक्यच नाही. एवढ्या दुःखात कुटुंबाला एकसंघ ठेवण्याचे काम घरातील एक मोठ्या जबाबदार भावाची भूमिका निभावताना आपण सगळ्यांनीच पाहिलं. ईश्वरांनी त्यांच्या वाट्याला खूप कठोर परिश्रम दिले, संघर्ष दिला. ईश्वराने त्यांच्या अनेक कठीण परीक्षा घेतल्या मात्र पप्पांनी कधीही समतोल, तोल ढळू दिला नाही. उलट त्यात ते अगदी शांत संयमाने परिस्थिती हाताळली आणि यशस्वी होत गेले.

आम्ही मुलं म्हणजे चुलत, भाऊ-बहिणी सगळ्यांना आधार देणारे मग भावनिक क्षण असो की अजून कुठलाही आमच्यासाठी सदैव तत्पर असणारे व्यक्तीमत्त्व म्हणजे माझे पप्पा. सगळ्या नातवंडाचे सुपर हिरो म्हणजे माझे पप्पा. रात्री कितीही उशीर झाला तरी नातवंडासोबत थोडा वेळ तरी घालवल्याशिवाय ते झोपत नाहीत. प्रत्येक नात-नातू यांना काय हवंय काय नको हे आवर्जून विचारणारे सगळ्या नातवांचे आजोबा म्हणजे त्यांचे मित्र. जणू अगदी शाळेला दांडी मारायची असेल किंवा एखादी वस्तू हवे असेल तर सरळ आजोबांकडे साकडं घातलं जातं, मग आजोबा त्यांचे सगळे लाड पुरवणार असं हे नात-नातू आणि आजोबांचे सुंदर नाते. एक मुलगी म्हणून माझ्या पप्पाबद्दल शब्द रुपी कृतज्ञता व भावना व्यक्त करणे तसे माझ्यासाठी अवघडच आहे. मनात अतीव आदराची भावना आहे. कंठ दाटून येतो मन भरून येते, शब्द अबोल होतात, पण तरीही ऊर अभिमानाने भरून येतो. एका प्रचंड वटवृक्षाचे वर्णन एका माझ्यासारख्या छोट्या वेलीने कसे बरे करावे. हृदयाच्या एका कप्प्यात ज्यांचे स्थान ध्रुवताऱ्यासारखे आढळ आहे, अशा माझ्या पप्पांबद्दल अतिव आदराने सद्गदित अंतःकरणाने मी माझे मोडके तोडके शब्द आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केला.ईश्वराकडे इतकीच प्रार्थना आहे की, पप्पांना आनंदी, निरोगी, दीर्घायुष्य लाभो. त्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद असेच आमच्या कुटुंब, परिवाराच्या पाठीशी राहो.ज्या सावलीत मी लहानाची मोठी झाली त्या सावलीची कायम माझ्यावर आधारवड म्हणून छत्र-छाया राहू दे, एवढीच ईश्वरचरणी प्रार्थना. पप्पांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**-सौ. प्रणिता देवरे-चिखलीकर**
प्रदेश महामंत्री, भाजपा महिला मोर्चा,
अध्यक्षा- जिजाऊ माँ साहेब महिला अर्बन बँक,
तथा संचालिका-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड

# जनसामान्याचे कुशल नेतृत्व; लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर



राजकारण आणि समाजकारणात अनेकांना घराण्यातील वारशाने पदे मिळतात. त्यांना नावलौकिक मिळतो, पण काहीजणांना मात्र स्वकर्तृत्वाने संघर्ष करत आपले नेतृत्वगुण सिद्ध करत नावलौकिक मिळवावा लागतो. यांमधील एक अग्रगण्य नाव म्हणजे लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर हे नांदेड जिल्ह्यालाच नव्हे तर सबंध मराठवाड्यात परिचितास आलेले सर्वमान्य नेतृत्व आहे. आज २ ऑगस्ट लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस.

आमदार चिखलीकरांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन करत असताना गेली तीन दशकातील त्यांच्या सामाजिक-राजकीय कारकीर्दीतील वाटचाल डोळ्यासमोरून सहज तरळून जाते. तेंव्हा प्रकर्षाने समोर येते ती बाब म्हणजे आमदार चिखलीकर यांनी नांदेड जिल्ह्यच्या राजकारणात आपले एक स्वतंत्र व अढळ स्थान निर्माण केले आहे, ते कुणाच्या मेहरबानीने नव्हे तर जनसामान्यांची खंबीर साथ व अंगी असलेल्या संघर्षशील बाणा आणि योग्य निर्णयक्षमता या बलस्थानामुळेच.

चिखली गावच्या सरपंच पदापासून आपल्या कारकिर्दीस सुरुवात करणाऱ्या प्रतापरावांनी १९९२ पासून तीन टर्म जिल्हा परिषदेचे सदस्य, जिल्हा परिषदेच्या विविध खात्यांचे सभापतीपद भूषवत ग्रामीण तसेच शहरी भागातील कार्यकर्त्यांशी आपुलकीचं नातं निर्माण करत जनतेच्या मनात आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. प्रत्येक निवडणुकीत वेगळे चिन्ह, वेगळा पक्ष असला तरीही बाणा तोच, जिद्द तिच, जनसामान्यांची साथ तिच, आजही कायम आहे.

जिल्हा परिषदेची कारकिर्द सुरू असतानाच २००४ ची विधानसभा निवडणूक लागली अन् अभी नही तो कभी नही ह्या तीव्र जनभावनेतून लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघाची अपक्ष निवडणूक लढवून सर्वसामान्य जनतेच्या विश्वासावर, जनता माझी मी जनतेचा..! हे ब्रिद सार्थ करत जनतेचे आमदार झालेले प्रतापराव आपण अनुभवले आहेत.

माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या खंबीर पाठबळामुळे वर्षानुवर्ष रखडलेले लिंबोटी धरण पूर्णत्वाचे शिल्पकार ठरलेले प्रतापराव! प्रसिद्ध माळेगांव यात्रेचे रूपडे बदलत विविध विकास कामांतून माळेगांव यात्रेला विकासाभिमुख चेहरा देणारे, सांस्कृतिक वारसा जपणारे प्रतापरावही आपण पाहिले आहेत.

अनेक विकासकामे करूनही सर्व विरोधकांच्या चक्रव्यूहात सापडून २००९ च्या विधानसभा निवडणुकीत अल्पमताने पराभूत झालेतरी न खचता जनतेच्या खंबीर पाठबळामुळे फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेत शिवसेनेत प्रवेश करून पराभवाचा व्याजासह वचपा काढत ५० हजारांच्या वर मताधिक्याने २०१४ च्या निवडणुकीत पुन्हा लोहा - कंधारचे आमदार झालेले प्रतापराव आपण पाहिले आहेत.

पुढे नेतृत्वाने दिलेला शब्द फिरवल्याने तत्कालीन व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शब्दांवर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीचे काम हाती घेत भाजपला सबंध नांदेड जिल्ह्यात बळ मिळवून देण्याचे काम केले.

दहा वर्ष आमदार म्हणून काम केलेले प्रतापराव देशाच्या सर्वोच्च सभागृहाचे सदस्य होत खासदार झाले असले तरी सर्वसामान्य जनतेशी असलेली नाळ त्यांनी कधीच तुटू दिली नाही. त्यांच्या 'साई सुभाष'वरील लोकदरबारातील असलेली कायम गर्दी ही लोकांच्या मनात असलेल्या त्यांच्याबद्दलच्या विश्वासाची हमी देत असते. याच जनतादरबारातून एक कॉल प्रॉब्लेम सॉल..! याची प्रचिती वेळोवेळी अनेकांना आलेली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात काम करत असताना एक कामाचा खासदार म्हणून जिल्ह्यात ओळख निर्माण केली, परंतु पुढे अनेक राजकीय घडामोडी घडल्या. महाराष्ट्रात भाजप विरोधात लाट उसळली त्याचा फायदा घेत प्रतापरावांच्या राजकीय विरोधकांनी संधान साधून २०२३ च्या लोकसभेत प्रतापरावांचा पुन्हा एकदा पराभव केला.

यशाने मातणार नाही, पराभवाने खचणार नाही..! हा मंत्र कायम जपत थेट जनतेत उतरून जनतेच्या सुख-दुःखात सभागी होणारे आणि जनतेसाठी वेळ देणारे नेतृत्व म्हणजे प्रतापराव पाटील चिखलीकर हे मात्र नक्की..! म्हणूनच लोकसभेनंतर आलेल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत लोहा-कंधारची जागा महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेली म्हणून ऐनवेळी स्व. अजितदादा पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून घड्याळ हाती बांधून लोहा- कंधारची विधानसभा लढवण्याचा निर्धार केलेलाही आपणास ज्ञात आहे.

तसा संघर्ष प्रतापरावांच्या पाचवीलाच पुजलेला. सर्व विरोधकांची एकजूट मतदारसंघात उभ्या राहिलेल्या जातीपातींच्या भिंती अनेक सहकाऱ्यांनी सोडलेली साथ आणि विशेष म्हणजे नात्यांमध्येच उभा राहिलेला संघर्ष ह्या चक्रव्यूहात पुन्हा एकदा प्रतापरावांना अडकवण्याचा अनेकांनी डाव रचला होता, पण बावन्नकशी सोने भट्टीत तावून-सुलाखून निघावे तसे प्रतापरावांनी हे अती अवघड चक्रव्यूह सर्व जातीधर्मातील विश्वासू मावळ्यांच्या बळावर आणि त्यांच्या अंगी असलेल्या कार्यकुशल, संयमी व योग्य निर्णयक्षमता या नेतृत्वगुणांच्या बळावर लिलया भेदणारे प्रतापराव..! आपण सर्वांनी याची देही याची डोळा पाहिलेले आहे.

आता प्रतापरावांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत असतांना सर्वांची एकच आस आहे ती म्हणजे प्रतापराव मंत्री व्हावेत आणि लोहा, कंधारच नव्हे तर संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील चाहत्यांचे स्वप्न साकार व्हावे हीच आई तुळजा भवानी चरणी प्रार्थना.

**-अशोक पाटील मारतळेकर**
(माजी चेअरमन व विद्यमान संचालक जिल्हा सहकारी शिक्षण पतपेढी, नांदेड)

# शिक्षणमहर्षी तथा क्रांतिकारी चळवळीचे प्रणेते कै. नागोराव जाधव



शिक्षणाची गंगा तळागाळातील लोकांच्या दारात पोहचावी म्हणून मोजक्याच मान्यवरांनी तळमळीने प्रयत्न केले.ह्या बोटावर मोजण्या इतक्या मंडळीत जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी ता.मुखेड या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी कै.नागोरावजी जाधव यांचा क्रमांक लागतो.

शिक्षण महर्षी नागोरावजी जाधव यांचा जन्म १२ डिसेंबर १९३४ रोजी उमरदरी ता.मुखेड या गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला.१९३४ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळ होता व त्यावेळी मराठवाड्यावर निजामाचा एकछत्री अंमल होता.नागोरावजी जाधव यांना पुर्व प्राथमिक शिक्षणासाठी त्यांच्या वडीलांनी त्यांना मुखेड येथे गोविंद मास्तर (गुरूजी) यांच्या खाजगी शाळेत दाखल केले.त्याकाळी अनिवार्य असलेली उर्दू भाषा त्यांना उत्तमरीत्या अवगत होती.त्यांचे हायस्कूलचे शिक्षण देगलूर येथील साधना हायस्कूल येथे पुर्ण झाले.

१९५७-५८ साली शासकीय बी.एड.कॉलेज, औरंगाबाद येथून त्यांनी बी.एड.ची पदवी प्राप्त केली.बी.ए.बी.एड. झाल्यानंतर शाळा व वस्तीगृहे सुरू करावीत असा विचार त्यांच्या मनात होता पण अर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने दोन वर्षात तीन ठिकाणी म्हणजे १९५४ ते १९५९ च्या दरम्यान शारदा भवन हायस्कूल, नांदेड येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून व जनता हायस्कूल नायगाव बाजार या शाळेचे पहिले मुख्याध्यापक म्हणून व मिलिंद विद्यालय, कुंडलवाडी या शाळेत मुख्याध्यापक म्हणून इतरांकडे नोकरी केली पण नोकरी करतांना केवळ आपलाच उध्दार होईल,आपले कुटुंब तेवढे सुखी होईल पण इतरांचे काय? या भावनेने आपल्या सभोवतालच्या खेड्यातील अज्ञानी व गरीब असलेल्या लोकांना शिक्षण देण्यासाठी १९५९ साली मुखेड तालुक्यातील उमरदरी येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून जून १९६० मध्ये उमरदरी येथे नरसिंह विद्यामंदिर सुरू केले.त्याकाळी विद्यार्थ्यांना अतिशय दुर दुरून चालत यावे लागत असे. विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन शिक्षण घेण्यासाठी आणि राहण्याची सोय एकाच ठिकाणी व्हावी या उद्देशाने त्यांनी दुसऱ्याच वर्षी कॉस्मॉपोलेटीन हॉस्टेलची सुरूवात केली.

नांदेड जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचे ते काही काळ सदस्य सुध्दा होते.भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सेक्रेटरी म्हणून सुद्धा काही काळ त्यांनी कार्य केले.त्यांनी 'आघात'नावाचे साप्ताहिक सुरू केले.भ्रष्टाचार विरोधी घणाघाती लेख त्यांनी या साप्ताहिकातून लिहिले.पुढे राजकारणात ते फारसे रमले नाहीत पण शैक्षणिक चळवळीपासून मात्र ते दुर गेले नव्हते.मात्र कालांतराने ते राजकीय क्षेत्र सोडून पुन्हा शिक्षण क्षेत्रातच त्यांनी झेप घेतली.कार्ल मार्क्स,लेनीन,एंगेल्स, शेक्सपिअर,महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील,संत गाडगे महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा व विचारांचा त्यांच्यावर मोठा पगडा होता.शेतकऱ्यांचे व कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकरिता व न्याय्य मागण्यांकरिता अनेक लोकचळवळी त्यांनी उभ्या केल्या.

महाराष्ट्र सांस्कृतिक मंडळाचे माजी अध्यक्ष तथा पीपल्स कॉलेजचे पहिले प्राचार्य डॉ.सुरेंद्र बारलिंगे यांनी त्यांच्या 'ओंजळभर पाणी' या आत्मचरित्रात नागोराव जाधव यांचा उल्लेख 'माझा सर्वात लाडका विद्यार्थी' असा केला आहे.आयुष्यामध्ये मानपानाचा विचार न करणाऱ्या व शिक्षण क्षेत्रात अहोरात्र काम करून नावलौकिक मिळविणाऱ्या या थोर शिक्षणतज्ज्ञास स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

**-बालाजी पाटोळे**
नांदेड

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर: राजकारण आणि समाजकारणाचे समांतर सत्ता केंद्र

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांपैकी सुसंस्कृत आणि मराठवाड्यातील विशेषत्वाने ओळख असलेला नांदेड हा एक प्रतिभाशाली जिल्हा म्हणून ओळखला जातो. नांदेड जिल्ह्याने आजपर्यंत राजकीय, सामाजिक, आर्थिक, ललित कला आणि साहित्य क्षेत्रामध्ये विशेषत्वाने गौरव मिळविला आहे.

जिल्ह्याला उज्ज्वल अशी राजकीय परंपरा आहे. अगदी पुरातन काळ तसेच मुघलांच्या आणि निजामाच्या काळापासून जिल्हा हा संघर्षमय आणि राजकीय हेतूने प्रेरित झालेला आहे. नांदेड जिल्ह्याला उज्ज्वल अशी राजकीय परंपरा आहे. अगदी पुरातन काळ तसेच मुघलांच्या आणि निजामाच्या काळापासून जिल्हा हा संघर्षमय आणि राजकीय हेतूने प्रेरित झालेला आहे. जिल्ह्याने स्वामी रामानंद तीर्थ, नरहर कुरुंदकर, भाई डॉ. केशवराव धोंडगे, डॉ. शंकरराव चव्हाण, शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर, भुजंगराव किनाळकर, बापूसाहेब गोरठेकर, भाऊसाहेब देशमुख, व्यंकटेश काब्देया आणि अशा विविध क्षेत्रातील दिग्गजांचा सामाजिक आणि राजकीय प्रभाव राहिलेला आहे.



याच परंपरेतील ग्रामीण भागातील सुसंस्कृत, शिस्तप्रिय वारकरी आणि शेतीनिष्ठ कुटुंबामध्ये शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांचे सुपुत्र म्हणून दोन ऑगस्ट १९६१ रोजी नांदेड जिल्ह्याचे नेते तथा माजी खासदार आणि विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा कंधार तालुक्यातील चिखली येथे जन्म झाला. जन्मतःच ते कृषी आणि सामान्य जीवन यांच्याशी नाळ जोडत राहिले. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर जिल्ह्यामध्ये राजकीय घडामोडी सतत व्हायच्या. प्रत्येक घडामोडीमध्ये कंधार तालुका हा राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या हिरीरीने सहभाग घ्यायचा. जिल्ह्याच्या राजकारणात बापूसाहेब देशमुख गोरठेकर, पद्मश्री शामराव कदम, गंगाधरराव कुंटूरकर, शंकरराव चव्हाण या आणि अशा नेत्यांच्या राजकीय कार्य गटासोबत शांत, संयमी आणि शिस्तप्रिय व्यक्तिमत्व शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर हे कार्यरत होते. त्यांचे सुपुत्र म्हणून प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यावर तत्कालीन काळापासून राजकीय आणि सामाजिक संस्कार होत राहिले.

नांदेड जिल्हा मुळात काँग्रेस आणि काँग्रेस विचारसरणीचा बहुतेक वेळा राहिला असल्याकारणाने आणि तत्कालीन फळीतील सर्व राजकीय नेते यांच्या संपर्कात येऊन चिखलीकर यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात केलेली आढळते. मुळातच राजकारणाची हाऊस आणि जनतेतून येणारे प्रश्न घेऊन सोडवण्याची तळमळ यातून चिखलीकरांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाला बळ मिळत राहिले. गावचा विकास करणे, परिसराचा विकास करणे आणि आपले राजकीय नेतृत्व सिद्ध करणे हा विचार असणारे प्रतापराव राजकारणामध्ये काहीतरी नवीन करतील हे तेव्हाही त्यांच्या नेतृत्वगुणातून जनतेला आणि पंचक्रोशीतील संबंधितांना वाटायचे.

अगदी फार कमी वयात इसवी सन १९८९ मध्ये त्यांनी चिखली गावची ग्रामपंचायतची निवडणूक लढवली आणि त्यात ते यशस्वी झाले. त्यानंतर त्यांचे वडील शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर आणि त्यांचे मोठे बंधू सुभाषराव पाटील चिखलीकर यांच्या सहकार्याने त्यांनी राजकीय जीवनाची सुरुवात केली. इसवी सन १९९२ मध्ये पहिल्यांदा ते पेठवडज जिल्हा परिषद गटामधून जिल्हा परिषदेची निवडणूक लढले.

जिल्ह्यातील जिल्हा परिषदेमध्ये कार्य करत असताना अनेक मातब्बर आणि राजकीय मंडळींशी त्यांचे सलोख्याचे संबंध आले. पुढे चार टर्म जिल्हा परिषदेमध्ये काम करत असताना जिल्हा परिषदेचे सभापती अर्थ खात्याचे सभापती आणि जिल्हा परिषदेतील जवळजवळ सर्व विभागांचे सभापती म्हणून तसेच जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

प्रबळ राजकीय इच्छाशक्ती असल्यानंतर जनतेचा विकास करता येतो आणि त्यातून जनतेचे प्रश्न सोडवता येतात ही इच्छाशक्ती मनात धरून त्यांनी आमदारकी लढवण्याचे ठरवले. मुळात संघर्ष हा त्यांच्या वाट्याला येणाराच होता आणि आमदारकीची निवडणूक लढवत असताना अपक्ष म्हणून ते आमदार झाले. दुसऱ्याला काही सांगायचं असेल, तर स्वतःला काही कळावं लागतं, आणि वर काही शिजायचं असेल, तर खाली काही जळावं लागतं. या उपरोक्त म्हणीप्रमाणे त्यांचा वैयक्तिक त्याग आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे राजकीय परिश्रम फळाला येऊन त्यांनी आमदारकी जिंकली.

राजकारणातील झंझावती नेतृत्वासोबतच आमदार चिखलीकर यांच्याबरोबरीने राजकीयदृष्ट्या त्यांची सुकन्या सौ. प्रणितताई देवरे-चिखलीकर या उच्चविद्या घोषित असून सामाजिक कार्यकर्त्या म्हणून हिरीरीने समाजकार्यात भाग घेत चिखलीकर यांच्या वतीने जनसेवा करत आहेत. सोबत चिखलीकर यांचे सुपुत्र नांदेड जिल्हा परिषदेचे माजी सभापती तथा युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांनीही राजकीय काम करत असताना आपल्या वडिलांना सामाजिक आणि नैतिक भावनेतून कार्य करताना फार मोठा जनाधार निर्माण केला असल्याचे जाणवत आहे.

एखाद्या कुटुंबाला आणि एखाद्या नेतृत्वाला जनतेने काही दिवसात मोठे केलेले नसते तर वारंवार त्यांच्या कार्याची पावती देत आणि दशकांचे त्यांचे कार्य पाहून एखादा सामान्य जनतेतून असामान्य नेता तयार होताना आपण पाहतो आणि त्याचे नांदेड जिल्ह्यातील समांतर सत्ता केंद्र म्हणून नेतृत्व उदयास आलेले असे हे नेते नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर आहेत. राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या आ. चिखलीकर यांनी राजकीय इच्छाशक्ती ठेवून जिल्ह्याच्या आणि पर्यायाने जनतेच्या विकासासाठी केलेले अफाट कार्य आणि चालू असलेले त्यांचे कार्य त्यांचे संघर्षमय जीवन यातून राजकीय इच्छाशक्ती आणि राजकीय हेतूने प्रेरित होणाऱ्या उदयन्मुख काळातील प्रत्येक होऊ घातलेल्या नेत्यांसाठी त्यांचे जीवन एक दीपस्तंभ आहे आणि त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांची राजकीय कारकीर्द अशीच भरभराटीस जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**-रत्नाकर फुलारी,**
मुख्याध्यापक तथा निवेदक
वडेपुरी, नांदेड.
मो. ९८८१५४७४४०

# नांदेडकरांची तहान भागविणारा विष्णुपुरी प्रकल्प तुडूंब!

## एक दरवाजा उघडला, ९२ टक्के क्षमतेने प्रकल्प भरला, प्रकल्पात पाण्याची आवक सुरूच



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहराची तहान भागवणारा विष्णुपुरी प्रकल्प यंदा पहिल्यांदाच तुडुंब भरला आहे. या प्रकल्पात आजघडीला ९२ टक्के जलसाठा उपलब्ध झाला असून, शनिवारी दुपारी तीन वाजता पाटबंधारे विभागाच्या वतीने एक दरवाजा उघडण्यात आला आहे. परिणामी गोदावरी नदीकाठच्या नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे विष्णुपुरी प्रकल्प तुडूंब भरल्याने नांदेडकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता आता दूर झाली आहे.

यंदा पावसाळ्यातील जून आणि जुलैच्या शेवटपर्यंत पावसाने ताण दिला होता. पिकांची परिस्थिती चिंताजनक होती; मात्र निसर्गाने दोन-तीन दिवसातच हे चित्र पालटले. अखेरीस जुलैच्या शेवटच्या आठवड्यातच झालेल्या दमदार पावसामुळे नांदेडकरांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवणारा विष्णुपुरी प्रकल्प १ ऑगस्ट रोजी तुडूंब भरला आहे. विष्णुपुरी प्रकल्पात अजूनही पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे आता प्रकल्पाचे दरवाजे कोणत्याही क्षणी उघडावे लागणार आहेत; परिणामी गोदावरीकाठच्या नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. विष्णुपुरी प्रकल्पाच्या खालच्या बाजूस असणाऱ्या सर्व गावातील नागरिकांनी मालमत्तेचे, पशुधनाचे तसेच इतर कोणतीही हानी होणार नाही यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन विष्णुपुरी प्रकल्पाच्या पूर नियंत्रण अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यात जुलै अखेरीस ४१८.६० मिलिमीटर पाऊस झाला आहे. आतापर्यंतच्या अपेक्षित पावसाच्या १०२ टक्के हा पाऊस झाला आहे. जिल्ह्याची वार्षिक सरासरी ही ८९१.३० इतकी आहे. जुलै अखेरीस ४०७.७० मिलिमीटर पाऊस अपेक्षित असताना जिल्ह्यात ४१६.७० मिमी पाऊस झाला आहे. एकूण सरासरीच्या ४६.९७% पाऊस जिल्ह्यामध्ये झाला आहे. गतवर्षी जुलैअखेर एकूण सरासरीच्या ८५.१० टक्के पाऊस झाला होता. गतवर्षीपेक्षा हा पाऊस जास्त असल्याने आता प्रकल्पामध्ये जलसाठ्यातही हळूहळू वाढ होत आहे. पिकांची परिस्थितीही उत्तम असल्याने आता सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

### एका दिवसातच पालटले चित्र..!

डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पात ३१ जुलै रोजी सकाळी ४२.२७ जलसाठा होता. प्रकल्पात ३६.९१ दशलक्ष घनमीटर पाणी होते. ३१ जुलै रोजी प्रकल्पात संपूर्ण पावसाळ्यातील एकूण ७.५७ दशलक्ष घनमीटर पाण्याची आवक झाली होती. त्यामध्येही ३१ जुलैची आवक ही ६.७४ दशलक्ष घनमीटर इतकी होती. प्रकल्पात प्रकल्प क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे विष्णूपुरी प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली आणि एका दिवसातच चित्र बदलले, हा प्रकल्प तुडुंब झाला परिणाम नांदेडकर आनंदी झाले आहेत. नांदेड महापालिकेनेही आता सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# 'हनीट्रॅप'च्या नावाने खंडणी मागणारे ५ जण गजाआड



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाग्यनगर पोलीस ठाणे हद्दीत एका व्यक्तीला कामानिमित्त बोलावून त्याचे फोटो व व्हीडीओ काढून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देत लाखो रुपयांची खंडणी उकळण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी तातडीने कारवाई करत अवघ्या काही तासांत ५ आरोपींना अटक करून गुन्ह्याचा छडा लावला आहे.

नांदेड येथील एका व्यक्तीला दि. ३१ जुलै २०२६ रोजी एका महिलेने मोबाईलवर संपर्क साधून ड्रायव्हरची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांना भाग्यनगर येथील ढवळे कॉर्नरजवळ, बेलानगर परिसरात बोलावण्यात आले. फिर्यादी घटनास्थळी पोहोचल्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या एक महिला व इतर ३ महिलांसह १ पुरुषाने त्यांना बोलण्यात गुंतवून जवळील एका घरात नेले. घरात नेल्यानंतर आरोपींनी फिर्यादीचे हात पकडून जबरदस्तीने त्यांचा शर्ट काढून बनियानवरच मोबाईलद्वारे त्यांचे फोटो आणि व्हीडीओ चित्रीत केले. त्यानंतर आरोपींनी हे फोटो व व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची तसेच फिर्यादीला खोट्या बलात्काराच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देत १ लाखाची खंडणीची मागणी केली. तसेच फिर्यादीच्या हातातील सुमारे ८ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी (अंदाजे किंमत १ लाख २० हजार) जबरदस्तीने काढून घेतली. आरोपींनी फिर्यादीला जीवे मारण्याची व बदनामी करण्याची धमकी देऊन घटनास्थळावरून पळ काढला.

घटनेनंतर फिर्यादी यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून गुन्हा क्र. ४०५/२०२६ कलम ३१०(२), ३०८(३), ३५१(२), ३५२ भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या नेतृत्वात पोउपनि. विनोद देशमुख व त्यांच्या गुन्हे शोध पथकाने तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली. तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदार व स्थानिक माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेऊन अल्पावधीतच सर्व आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी शीला सुनील भदरगे (वय ३९ वर्षे, रा. बेलानगर, नांदेड), इंदुबाई विठ्ठलराव बाऱ्हाटे (वय ५५ वर्षे, रा. संतोषनगर, नांदेड), सुनिता रामकांत सोनकांबळे (वय ५५ वर्षे, रा. सप्तगिरी कॉलनी, नांदेड), रेखा रामचंद्र इंगोले (वय ४५ वर्षे, रा. देगावचाळ, नांदेड), अमन मारोती कांबळे (वय २२ वर्षे, रा. पालीनगर, नांदेड) या सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून अशा प्रकारचे आणखी गुन्हे झाले आहेत का याचा तपास सुरू आहे.

नमूद आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली दोन स्कुटी वाहने (अंदाजे किंमत १ लाख ५० हजार), विविध कंपनीचे चार मोबाईल फोन (अंदाजे किंमत ८० हजार), एक तीन चाकी ऑटो (अंदाजे किंमत २ लाख) तसेच गुन्ह्यात गेलेला माल – ८ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी (अंदाजे किंमत १ लाख २० हजार) असा एकूण ५ लाख ५० हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख हे करीत आहेत.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर वैंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष तांबे, महेश माळी व गुन्हे शोध पथकातील पोउपनि. विनोद देशमुख, पोउपनि. नरेश वाडेवाले, पोलीस अंमलदार विशाल माळवे, विष्णुकांत मुंडे, सुधाकर मलदोडे, राजीव घुले, नागनाथ चापके, राहुल लाठकर, आदनान पठाण, अंकुश कांबळे, व्यंकटेश गांगुलवार सर्व नेमणूक पोलीस स्टेशन भाग्यनगर यांनी पार पाडली आहे.

## किनवटमध्ये डीवायएसपींच्या पथकाची धाड; १६ जुगारी अटकेत

**किनवट (प्रतिनिधी) –** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत किनवटचे पोलीस उपअधीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या विशेष पथकाने शुक्रवार, दि. ३१ जुलैच्या रात्री गोकुंदा येथील हमाल कॉलनी परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर धाड टाकून १६ जुगाऱ्यांना अटक केली आहे.

गोकुंदा येथील हमाल कॉलनीतील टीनशेडच्या घराजवळील मोकळ्या जागेत काही व्यक्ती अंदर - बाहर या पत्त्यांच्या खेळावर पैशांची हार-जीत लावून अवैधरित्या जुगार खेळत असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांना शुक्रवारी रात्री मिळाली. या माहितीवरून विशेष पथकाने तत्काळ पंचासमक्ष छापा टाकला. यावेळी आरोपी शेख समीर शेख फरीद रा. समतानगर, किनवट, शेख साहिल शेख चाँद रा. दत्तनगर, गोकुंदा, शेख रफीक शेख अमजद रा. समतानगर, किनवट, सैयद शाहिद सैयद सुर रा. मोमीनपुरा, किनवट, सैयद मोसीन सैयद खाजा रा. सुभाषनगर, किनवट, सोहेल शेख अब्दुल गफार रा. समतानगर, किनवट, सैयद माजीद सैयद अख्तर रा. बिलालनगर, गोकुंदा, लतीफ खान मतीन खान रा. दत्तनगर, गोकुंदा, शेख समीर शेख हारुन रा. बिलालनगर, गोकुंदा, सलमान रमजान सैयद रा. समतानगर, किनवट, सैयद कलीम सैयद हमदुल्ला रा. समतानगर, किनवट, शेख रफिक शेख फरीद रा. हबीब कॉलनी, गोकुंदा, आफताब खान वसीम खान रा. मोमीनपुरा, किनवट, हर्षद जानी खान रा. समतानगर, किनवट, अनवर अली मकसूद अली शेख रा. सुभाषनगर, किनवट, शेख अशरफ शेख मुस्तफा रा.सुभाषनगर, किनवट हे पत्यावर पैसे लावून अंदर -बाहर नावाचा जुगार खेळत असताना रंगेहात पकडले गेले. या धाडीत पथकाने बदकछाप ५२ पत्ते व रोख ९ हजार आठशे रुपये जप्त केले. याप्रकरणी वरील आरोपींवर किनवट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा, कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# जुना कौठा येथे वाढदिवसानिमित्त चिखलीकर यांचे अभीष्टचिंतन





**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** श्री बालाजी मंदिर विकास नगर जुना कौठा नांदेड येथे कंधार, लोहा तालुक्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त सपत्नीक अभिषेक आरती व वसरणी येथील अंध शाळेच्या मुलांना खाऊचे वाटप व मंदिर विश्वस्थ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी १५ लक्ष रुपयांचा विकासनिधी कामाचा शुभारंभ करण्यात आला.

श्री बालाजी मंदिर विकास नगर जुना कौठा नांदेड येथे भक्तांच्या सोयीसाठी लोहा, कंधार तालुक्याचे लोकनेते तथा आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस २ ऑगस्ट रोजी आहे, परंतु त्यांच्या कामाच्या व्यस्ततेमुळे भगवान बालाजीच्या मंदिरामध्ये शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचा अभीष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी सहपरिवार यांच्या हस्ते अभिषेक आरती करण्यात आली. यानंतर अंध विद्यालय वसरणी येथील लहान मुलांनी भक्तिगीते सादर केली. नंतर मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी १५ लक्ष रुपये विकासनिधी कामाचा शुभारंभ करण्यात आला.

श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्ट विकास नगरचे अध्यक्ष उद्धवराव बसवदे पाटील तसेच सहसचिव बाबाराव इबितवार, कोषाध्यक्ष उत्तमराव भाले व सर्व संचालक मंडळ, जिल्हा परिषद शिक्षक गृहनिर्माण सोसायटीचे अध्यक्ष उत्तमराव पाटील वरपडे तसेच सचिव गंगाधर बडवणे व संचालक मंडळ सामाजिक कार्यकर्ते विनोद काकडे महिंद्र काळे यांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

या सोहळ्याला विकास नगर, वृंदावन कॉलनी, बसवेश्वर नगर, गाडगे महाराज सोसायटी व जुना कौठा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड –** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पूर्णाकृती पुतळ्यास विविध संघटनांच्यावतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी मंत्री डी. पी. सावंत, आ. अमर राजूरकर, महापौर कविता मुळे, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, प्रणिता देवरे-चिखलीकर, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, विजय येवनकर, विरेंद्रसिंघ गाडीवाले, संतोष मुळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा, नांदेड)**

# आ. बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त अंध विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप व वृक्षारोपण





**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत सिडको शहरप्रमुख सुहास खराणे पाटील यांनी वसरणी येथील अंध विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. तर जिल्हा परिषद शाळा परिसरात वृक्षाची लागवड केली. यावेळी शाळा प्रशासनाच्या वतीने परिसरात पेवरब्लॉक बसवण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

यावेळी आ. आनंदराव बोंढारकर यांच्या सौभाग्यवती सरस्वती बोंढारकर यांनी ही मागणी मान्य केली. यावेळी जिल्हाप्रमुख विनय गिरडे, शहरप्रमुख सुहास खराणे यांची उपस्थिती होती.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत दि. १ रोजी सिडको शहरप्रमुख सुहास खराणे पाटील यांनी वृक्षारोपण व अंध विद्यार्थ्यांना खाऊ वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला आ. बोंढारकर यांच्या सौभाग्यवती स्वरस्वती बोंढारकर, जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, श्याम वानखेडे यांच्या उपस्थितीत वसरणी येथील ज्योतीबा फुले सेवा ट्रस्ट संचलित निवासी अंध विद्यालयातील विद्यार्थांना खाऊचे वाटप मान्यवराच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी आ. बोंढारकर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत शिवसैनिकांना हार तुरे न घेता प्रत्येकांनी कमीत कमी दहा वृक्षाची लागवड करावी, अशी विनंती केली होती. त्यानुसार सुहास पाटील खराणे यांनी एक हजार वृक्षाची लागवड करण्याचा निर्धार करत जिल्हा परिषद शाळेत वृक्ष लागवड केली. यावेळी सौ. सरस्वती बोंढारकर व जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांनी जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण केले.

यावेळी सुहास खराणे, सचिन खराणे, आकाश मोरे, भालचंद्र मोळखे, सुदर्शन खराणे, गणेश काळे, अन्नपूर्णा खराणे, प्रेमाबाई खराणे, ज्योती खराणे, अर्चना खराणे, अंध विद्यालयाचे इबितवार यांची उपस्थिती होती.


## टी.सी. हरवली

माझी शेख मोसीम शेख हुसैन या नावाची दहावी पासची टी.सी. नांदेड ते देगलूर प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**शेख मोसीम शेख हुसैन**
**रा. अशरफनगर, हिंगोली गेट नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी मोहम्मद अब्दुल शकील एम.ए. समी खमर या नावाची बी.कॉम. पासची टी.सी. अरब गल्ली ते जुना मोंढा प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**मोहम्मद अब्दुल शकील**
**एम.ए. समी खमर**
**रा. रेहमान प्लाझा, मनपा हॉस्पिटल, अरब गल्ली, किल्लारोड नांदेड मो.नं. ९८९०८३५६६३**

## Change In Name

I HAVE CHANGED MY NAME FROM (OLD NAME) **DEELIPSINGH BHAGILE** TO (NEW NAME) **DILIPSING BHAGILE**
**ADDRESS:S/O: BABUSING BHAGILE, 11356 RAHUL SERVICEING CENTER, HINGOLI GATE, OPP. B.D. CHAVAN HOSPITAL NANDED MAHARASHTRA 431601.**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## जाहीर प्रगटण

सर्व जनतेस व सर्व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड च्या सर्वे नं.38 असदुल्लाबाद मधील श्री रोहीत प्रेमकुमार बुलबुले व श्री महेश नामदेवराव अंबोरे हे संस्थेचे मुळ सभासद आहेत. संस्थेत श्री रोहीत प्रेमकुमार बुलबुले यांच्या मालकीचा प्लॉट नं.31 हा आहे. या प्लॉटमधील मोजणीअंती 5 x 80 (400) चौ.फु. एवढी जागा श्री महेश नामदेवराव अंबोरे यांना रू.22,50,000/- एवढ्या किंमतीस कायमची विक्री केलेली आहे. याबाबत श्री प्रदीप व्यंकटराव टोंबरे व त्यांचे कुटूंबीय आणि भाऊबंदकी यांचा कोणताही आक्षेप तथा उजर नाही. सदरील 5 x 80 (400) चौ.फु. आणि श्री महेश नामदेवराव बुलबुले यांचा मुळ प्लॉट 30 x 80 = 2400 चौ.फु. असे दोन्ही जागा मिळुन एकुण 35 x 80=2800 चौ.फु. एवढी जागा श्री महेश नामदेवराव अंबोरे यांच्या मालकीची झाली आहे. सदरील जागेवर श्री महेश नामदेवराव अंबोरे यांचाच आज रोजी ताबा आहे.

तसेच आज रोजी मोजणीअंती श्री प्रदीप व्यंकटराव टोंबरे या प्लॉट क्र.32 मधील 5 x 80 = 400 चौ.फु. जागा श्री बुलबुले यांना विकल्यामुळे त्यांचा प्लॉट क्र.32 आज रोजी 55 x 80 = 4400 एवढा शिल्लक आहे. सदरील प्लॉट आज रोजी श्री टोंबरे यांचे ताब्यात आहे.

तरी उपरोक्त व्यवहारावर कोणाचा कोणताही, जागेचा आर्थिक / वाटणी / हिस्सा, कुळ, कर्ज, खाजगी अथवा सहकारी संस्था तथा सरकारी कर्जाचा काही बोजा ई.असल्यास संस्थेच्या सचिव अथवा अध्यक्षाकडे आपला लेखी कागदपत्रासह काही आक्षेप, उजर, हितसंबंध असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसाचे आत संस्थेकडे द्यावा. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. त्यानंतर सदरील 5 x 80 (400 चौ.फु.) ही जागा श्री प्रदीप व्यंकटराव टोंबरे यांच्या प्लॉट नं.32 मधुन कमी करून श्री रोहीत प्रेमकुमार बुलबुले यांचे नावावर हस्तांतरीत करण्यात येईल. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी म्हणुन हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

जाहीर प्रगटन देणार
**अध्यक्ष**
दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड

## जाहिरात
## भारतीय स्टेट बैंक
## (SBI)

भारतीय स्टेट बैंक, गृह कर्ज केंद्र, नांदेड यांच्यासाठी भाडे करार तत्त्वावर १ टॅक्सी परमिट कार घेणे आहे। अटी व शर्ती मान्य असणारयानी आपले प्रस्ताव व दरप्रतक कार्यालयीन वेळेत खालील पत्यावर जमा करावे ।


कार डिसायर, अमेज किंवा दूसरी तत्सम कंपनीचे (०१/०१/२०२३) नंतरची निर्मित असावी. आपला प्रस्ताव कुठलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार बैंक राखून ठेवत आहे। प्राप्त प्रस्तावा मध्ये सर्वात कमी दराच्या पहिल्या तीन प्रस्तावा बरोबर बोलणी करून प्रस्ताव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे।

प्रस्ताव जमा करण्याचा शेवटचा दिनांक ०७/०८/२०२६

दिनांक-३१/०७/२०२६

भारतीय स्टेट बँक, गृह कर्ज केंद्र
दुसरा मजला, झचउ शाखा कम्पाउण्ड
नवीन मोंढा
नांदेड़ -४३१६०२

मुख्य व्यवस्थापक
स्टेट बँक ऑफ इंडिया
एपीएमसी शाखा, नवीन मोंढा नांदेड





**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com

# राज्यात आणखी पावसाचा जोर वाढणार

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कारण काही भागात पाऊस पडत आहे तर काही भागात अद्यापही चांगला पाऊस पडत नसल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अशातच हवामान विभागान महत्वाची माहिती दिली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने राज्यासाठी पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला आहे. राज्यात मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता लक्षात घेता विविध जिल्ह्यांसाठी अलर्ट जारी करण्यात आला आहे.

आज दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी रायगड, पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसर, रत्नागिरी, कोल्हापूर, अकोला, वाशिम, अमरावती, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी रत्नागिरी, सातारा घाट परिसर, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट कायम ठेवण्यात आला आहे.

दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना व विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी बुलढाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

नागरिकांनी विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसाच्या काळात आवश्यक ती खबरदारी घ्यावी, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा तसेच स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने जारी केलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

दरम्यान, हवामान विभागाने राज्याच्या विविध भागात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना काही सूचना गेखील केल्या आहेत. नागरिकांनी या कालावधीत सतर्क राहावे. विशेषतः सखल भाग, नदी-नाल्यांचा परिसर तसेच घाट रस्त्यांवरून प्रवास करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.







# बॉक्सिंगमध्ये भारताचा सुवर्णधमाका; प्रीती पवार आणि जास्मिन लांबोरिया ठरल्या सुवर्णकन्या!

**ग्लासगो (वृत्तसंस्था)**– राष्ट्रकुल खेळ २०२६ च्या दहाव्या दिवशी भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी सुरूच ठेवली आहे. रिंगण गाजवत भारतीय बॉक्सर प्रीती पवार आणि जास्मिन लांबोरिया यांनी देशाला दोन सुवर्णपदके मिळवून दिली आहेत. बॉक्सिंगमधील या दणदणीत यशासोबतच ॲथलेटिक्समध्येही भारताने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

पुरुष गटाच्या 'ट्रिपल जंप' स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी शानदार कामगिरी केली. प्रवीण चित्रावेल याने अप्रतिम उडी मारत भारतासाठी रौप्यपदक पटकावले, तर याच स्पर्धेत सेल्वा प्रभू तिरुमारन याने कांस्यपदक जिंकून भारताच्या खात्यात आणखी एका पदकाची भर घातली.

या नव्या विजयांसह भारताच्या एकूण पदकांची संख्या आता २७ वर पोहोचली असून यामध्ये ७ सुवर्णपदकांचा समावेश आहे. दहाव्या दिवशीही बॉक्सर, ज्युडोपटू आणि ॲथलीट्स मैदानात उतरणार असून पदकांची ही संख्या आणखी वाढण्याची मोठी शक्यता आहे. विशेष म्हणजे, आज रात्री भारताचे आणखी ८ बॉक्सर सुवर्णपदकाच्या शर्यतीत उतरणार आहेत.







# ॲंटिलिया स्फोटक आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणी सचिन वाझे, प्रदीप शर्मासह १० आरोपींवर अखेर आरोप निश्चित

**मुंबई (प्रतिनिधी)**– उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या 'ॲंटिलिया' निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी सापडल्याच्या आणि उद्योगपती मनसुख हिरेन यांच्या हत्येच्या बहुचर्चित प्रकरणात मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि माजी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्यासह एकूण १० आरोपींविरोधात अखेर ५ वर्षांनंतर आरोप निश्चित करण्यात आले आहेत.

आरोप निश्चिती झाल्यामुळे या हायप्रोफाइल प्रकरणाच्या प्रत्यक्ष सुनावणीचा आणि खटल्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्व आरोपींविरुद्ध बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या विविध गंभीर कलमांखाली खटला चालवला जाणार आहे.

# सर्वोच्च न्यायालय धनुष्यबाण आपल्याला देईल, नाहीतर चिन्ह गोठवेल -उद्धव ठाकरे

**मुंबई (प्रतिनिधी)**– गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या सुनावणीसंबंधी उद्धव ठाकरे यांनी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. सर्वोच्च न्यायालय शिवसेना पक्षचिन्ह आपल्यालाच देणार, आणि जरी चिन्ह आपल्याला मिळालं नाही तर ते गोठवलं जाईल, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी केला. तसेच सध्याचा काळ हा पक्षवाढीसाठी अनुकूल असून २०२९ च्या निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.







रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




शुभचिंतन
लोहा-कंधार विधानसभेचे
लोकप्रिय आमदार,
समिती प्रमुख उपविधान समिती,
विधीमंडळ, महाराष्ट्र राज्य,
मराठवाड्याचे लोकनेते, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव
पाटील चिखलीकर
साहेबांना जन्मदिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !
लिंबोटी धरणाचे
शिल्पकार
शुभेच्छुक - माळाकोळी सर्कल ता.लोहा जि.नांदेड


लिंबोटी धरणाचे
शिल्पकार
लोहा-कंधार विधानसभेचे लोकप्रिय आमदार,
समिती प्रमुख उपविधान समिती, विधीमंडळ, महाराष्ट्र राज्य,
मराठवाड्याचे लोकनेते, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव
पाटील चिखलीकर
साहेबांना जन्मदिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !
शरद पवार
नगराध्यक्ष
शेख करीम
उपनगराध्यक्ष
भास्कर पवार
गटनेता
केशव मुकादम
नगरसेवक
अविनाश पवार
नगरसेवक
हरि चव्हाण
नगरसेवक
सतीश निखाते
नगरसेवक
तुकाराम दाडेल
नगरसेवक
श्याम पवार
नगरसेवक
सदानंद तेलंग
नगरसेवक
शंकर वट्टमवार
नगरसेवक
गणेश पा.बगाडे
नगरसेवक
सौ.सुशिलादेवी परिहार
नगरसेविका
सौ.लक्ष्मीबाई धुतमल
नगरसेविका
सौ.पार्वतीबाई जंगले
नगरसेविका
सौ.भागाबाई पवार
नगरसेविका
सौ.अनिता यरलवाड
नगरसेविका
सौ.पूजा खिल्लारे
नगरसेविका
सौ.माधुरी बोडके
नगरसेविका
शुभेच्छुक : सर्व नगरसेवक/नगरसेविका,न.प.,लोहा जि.नांदेड


शुभचिंतन
समिती प्रमुख उपविधान समिती, विधीमंडळ,
महाराष्ट्र राज्य तथा लोहा-कंधार विधानसभेचे
लोकप्रिय आमदार, मराठवाड्याचे लोकनेते, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव
पाटील चिखलीकर
साहेबांना जन्मदिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !
अब्दुल म.सरवर
उपनगराध्यक्ष,
न.प.कंधार
जफरोद्दीन बाहोद्दीन
मा.उपनगराध्यक्ष,
न.प.कंधार
सौ.अनुराधा केंद्रे
गटनेत्या,न.प.
कंधार
हणमंत लुंगारे
नगरसेवक,न.प.
कंधार
म.समीरउल्ला अमीरउल्ला
नगरसेवक,न.प.
कंधार
शेख अजमेरी अब्दुल
नगरसेविका,न.प.
कंधार
सौ. मेघा कांबळे
नगरसेविका,न.प.
कंधार
खैसर बेगम इस्माईल
नगरसेविका,न.प.कंधार
परवीन जफरोद्दीन
नगरसेविका,न.प.कंधार
प्रकाश कदम
नगरसेवक,न.प.,कंधार
परवीन बेगम खान
मा.सदस्या,पं.स.कंधार
सौ.कविता कांबळे
नगरसेवक,न.प.,कंधार
महेश पिनाटे
नगरसेवक,न.प.कंधार
शुभेच्छुक -
सर्व
नगरसेवक
नगरसेविका,
न.पा.कंधार


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नांदेड जिल्हा
नेतृत्व दमदार,
कर्तृत्व अथांग...
मन्याड खोऱ्याचा बुलंद आवाज...
लोकनेते,
लोहा-कंधार विधानसभेचे
लोकप्रिय आमदार, मा.खासदार
मा.श्री. प्रतापराव पाटील
चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक
शुभेच्छा!
कन्हैया कदम
प्रदेश उपाध्यक्ष
संभाजी मुकनर
प्रदेश उपाध्यक्ष
राहुल हंबर्डे
प्रदेश सरचिटणीस
अतुल हिंगमिरे
प्रदेश सरचिटणीस
विक्रम नागशेट्टीवार
प्रदेश सचिव
मोहसीन खान पठाण
शहराध्यक्ष,रा.यु.काँ.
बालाजी शिंदे
जिल्हाध्यक्ष,रा.यु.काँ.,नांदेड दक्षिण
स्वप्निल इंगळे
जिल्हाध्यक्ष,रा.यु.काँ.,नांदेड उत्तर
शुभेच्छुक - राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी, नांदेड जिल्हा


आपल्या कार्याला यश,
समाजाला नवी प्रेरणा
आणि आयुष्याला उत्तम
आरोग्य लाभो.
वाढदिवसाच्या शुभेच्छा!
आमचे आधारवड व कार्यकुशल
नेतृत्व, लोकनेते आमदार
मा. प्रतापरावजी
पाटील चिखलीकर
व युवानेते
मा. प्रवीण
पाटील चिखलीकर
04 AUGUST
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा!
दिलिपराव देवकांबळे
चेअरमन
माणिकराव कदम
व्हाईस चेअरमन
हणमंत जोगपेटे
सचिव
अशोक पाटील मारतळेकर
मा. चेअरमन
• बंडू पाटील भोसले • सुधाकर थडके • संजय अंबुरे • बालासाहेब लोणे • सौ. राजश्री सुहासराव देशमुख-मुळे • सौ. संगीता ज्ञानेश्वर माळगे-फसमले • माधव परगेवार • जयवंतराव काळे • अण्णाराव गुमनर
संचालक मंडळ, सहकारी पतपेढी शिक्षण विभाग मर्यादित जिल्हा परिषद नांदेड
शुभेच्छुक - अशोक पाटील मारतळेकर, मा. चेअरमन व विद्यमान संचालक


मान्यड
खोऱ्याचा
बुलंद
आवाज
लोहा-कंधार
विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
02 August
साहेब आपणास वाढदिवसानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छूक
• प्रभाकरराव दिगंबरराव मोरे आंचोलीकर,
• विशाल विनायकराव शिंदे मांजरमकर,
• ऋषीकांत विनायकराव मोरे आंचोलीकर


जनसामान्यांच्या
मनातील नेतृत्व
लोहा-कंधार
विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस
तथा नांदेड जि.प.मा.सभापती
मा.श्री.प्रवीण
पाटील चिखलीकर
04 AUGUST
यांना वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
प्रद्युमन सुरेश राठोड
संचालक- हॉटेल जी.एन.एक्झिक्युटीव्ह
वसंतराव नाईक चौक, नांदेड


साहेब
औक्षवंत व्हा
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार मा.श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस
तथा नांदेड जि.प.मा.सभापती
4 AUGUST
मा.श्री.प्रवीण
पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
अध्यक्षा
सौ.सुनिताबाई अशोकराव डावकोरे
तांत्रिक सल्लागार
अशोक शामराव डावकोरे
प्रकाशक
श्री बालाजी
फिल्डवेल कोऑपरेटिव्ह सोसायटी म.
पेठवडज ता. कंधार, जि. नांदेड.